सं.फौ.खटला क्र. २३३/२०२४.
नि. क्र. ५ खाली.

सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १.

मी शपथेवर कथन करतो की,

नाव – सुभाष गुंडू आजगेकर.

वय - ४१ वर्ष, **व्यवसाय** - शेती व पोलिस पाटील,

राहणार.- पेंढारवाडी, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

सरकार पक्षातर्फे सरतपास– श्री.एस.बी. कांबळे, सरकारी वकील.

१. मला दि.०४.०६.२०२४ रोजी पोलिस हवालदार प्रशांत सुतार, नेमणूक उपविभागीय पोलिस अधिकारी गडहिंग्लज यांनी जुना उत्तूर ते गडहिंग्लज रस्त्यावरील जुन्या मराठी शाळेजवळ पंचनाम्यासाठी बोलाविले होते. त्यांनी मला भैरु कदम यांच्या घरी भाडयाने राहत असलेल्या किरण लक्ष्मण जाधव हा त्याच्या घरामधून दारु विकत असल्या बाबत माहिती मिळाल्याचे सांगितले होते. त्यांनी मला सदर कारवाई करीता पंच म्हणून हजर राहण्याची विनंती केली होती.

२. मी पंच म्हणून काम करण्यास तयारी दर्शविल्यानंतर दुसरा पंच सुधाकर घुले, पोलिस अधिकारी प्रशांत सुतार साहेब, महिला पोलिस हवालदार कळेकर व पाटील आणि पोलिस हवालदार देसाई यांच्यासोबत किरण जाधव राहत असलेल्या घरी गेलो होतो. आम्हाला तेथे गेल्यानंतर एक इसम मिळून आला होता. पोलिस कर्मचा–यांनी त्याला आमचा परिचय करुन देऊन नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव किरण लक्ष्मण जाधव असल्याचे सांगितले होते. आम्हाला नावाची खात्री पटल्यानंतर आम्ही त्याला कशासाठी आलो आहोत याबाबत सांगून आमची अंगझडती घेण्यास सांगितले होते. आरोपी किरण याने आमची अंगझडती घेण्यास नकार दिला होता.

३. त्यानंतर १८.३० वाजता आम्ही आरोपीच्या घरात छापा मारला असता, आम्हाला त्याच्या घरामध्ये मॅकडॉल, व्हीस्की, मॅकडॉल रम, इंपेरियर ब्ल्यू व्हीस्की, रॉयल स्टॅग, रॉयल चॅलेंज व्हीस्की व देशी दारु संत्राच्या १८० मिलीच्या बाटल्या, टयूबर बिअरच्या ६५० मिलीच्या बाटल्या असा एकूण ४६,०२४/– रुपयांचा मुद्देमाल मिळून आला होता. पोलिसांनी तो आमच्या समक्ष जप्त करुन त्यावरती कागदी लेबल लावले होते.

४. पोलिसांनी जप्त केलेल्या मुद्देमालातील प्रत्येक नमुन्यातील एक सिलबंद बाटली

रासायनिक तपासणीकामी वेगळी करुन त्याबाबतचा पंचनामा केला होता. आता मला तो पंचनामा दाखविला, त्यावरती अनु.क्र.१ ला माझी स्वाक्षरी असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला नि. क्र. पी-६ देण्यात येतो. मला पोलिसांनी जप्त केलेला मुद्देमाल दाखविल्यास ओळखू शकतो. आज आरोपी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पुर्ण.

आरोपीतर्फे उलटतपास - श्री. एस. एस. इंजल वकील.

५. मी डिसेंबर २०१७ पासून पोलिस पाटील म्हणून काम करत आहे. मला पोलिस पाटील म्हणून नियमा प्रमाणे डायरी ठेवावी लागते. त्यामध्ये गावात घडलेल्या घटनांसह पोलिसांनी बोलावल्या बाबतचा तपशील लिहावा लागतो. मी दि.०४.०६.२०२४ रोजीचा मजकूर माझ्या डायरीत लिहिलेला नाही. मी पोलिस पाटील असल्यामुळे नियमित पोलिस ठाण्यात जात असतो. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांनी सांगितलेल्या हुकूमाचा तामिलदार आहे.

६. मला पंचनाम्यासाठी बिट अंमलदार कांबळे यांनी बोलाविले होते. दि.०४.०६.२०२४ रोजी लोकसभा निवडणूकीचा निकाल होता. त्या दिवशी उत्तूर भागात सगळीकडे पोलिस बंदोबस्त होता. पोलिसांनी बोलाविले तेव्हा मी घरी होतो. पोलिसांनी बोलाविल्यानंतर मी उत्तूर दूरक्षेत्र कार्यालयात गेलो होतो. तेथे असलेल्या सुधाकर हुले याने मला पंचनाम्यासाठी नेले होते. सुधाकर हुले हा उत्तूर दूरक्षेत्रात सफाईचे काम करतो. मी व सुधाकर हुले असे दोघेच जुन्या मराठी शाळेत घटनास्थळी गेलो होतो. मला त्या जागेचा सिटी सर्वे अथवा ग्रामपंचायत मिळकत क्रमांक सांगता येणार नाही.

७. मला घटनास्थळाच्या चर्तुःसिमा सांगता येणार नाहीत. मी व सुधाकरने जाताना सोबत काहीही नेले नव्हते. आमच्या अगोदर गेलेल्या पोलिस कर्मचा-यांनी सोबत तपासाचे साहित्य आणलेले होते. पोलिसांनी लॅपटॉप वापरण्यासाठी आरोपीच्या घरातून विजपुरवठा घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी अगोदर तयार केलेल्या पंचनाम्यावरती मी व सुधाकरने स्वाक्ष-या केल्या होत्या. मला त्या दिवशी मी किती स्वाक्ष-या केल्या याबाबत सांगता येणार नाही. पोलिसांनी जप्त केलेल्या नमुन्याच्या बाटल्यांमध्ये आमच्या समक्ष कोणतेही संप्रेरके टाकले नव्हते.

८. हे म्हणणे खरे नाही की, दि.०४.०६.२०२४ रोजी पोलिसांनी मला पंचनाम्यासाठी

बोलाविलेले नसून कोणतीही कारवाई केलेली नाही. मला पोलिसांनी जप्त केलेल्या बाटल्यांचे बॅच क्रमांक सांगता येणार नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांच्या सांगण्यावरुन आरोपीच्या ताब्यातून मुद्देमाल जप्त केल्याचे खोटे सांगत आहे. मला आज जप्त केलेला मुद्देमाल दाखविण्यात आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांना मदत करण्यासाठी आज खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – २२.११.२०२४.

(आर. पी. थोरे)

आजरा.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.